Tuesday, February 04, 2025
12:40 PM

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०४/०२/२०२५

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप. न. १०७/२०२५ क. ११८(१), ३५२, बीएनएस | पंचशील हाउसिंग सोसायटी तक्षशिला महाविद्यालय जवळ अमरावती | घटना ता वेळ - दि. ०२/०२/२०२५ चे २१.४५ वा. दरम्याण दाखल ता वेळ - दि. ०३/०२/२०२५ चे ००.१५ वा. | नामदेवराव भदुजी इंगोले वय ७४ वर्ष रा. पंचशील हाउसिंग सोसायटी तक्षशिला महाविद्यालय जवळ अमरावती | राहुल वसंतराव गवई रा. तक्षशिला महाविद्यालय अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्याचे परिवारासह देवदर्शन करुन टॅक्सीगाडीने घरी आले असता टॅक्सी गाडी रिव्हर्स घेत असतांना त्या गाडीचे मागील काही अंतरावर आरोपी हा दारु पिवुन मोटास सायकल घेवुन उभा होता तो दारुच्या नशेत असल्याने त्याचे बॅलेन्स जावुन गाडी खाली पडली तो फिर्यादीस म्हणत होता की, तुमच्या गाडीमुळे पडलो मी फिर्यादीने आरोपी म्हटले की, तु दारु पिल्यामुळे स्वताहा पडला आमची गाडीतर खुप दुर आहे असे म्हटल्यावर आरोपीने फिर्यादीचे मुलगा सुहास इंगोले याला डोक्यावर बुक्यांनी मारहाण केली व फिर्यादी सोडवायला गेले तर आरोपीने फिर्यादीच्या पाठीवर,छातीवर बुक्यांनी मारहाण केली फिर्यादीस किरकोळ मार लागला तसेच फिर्यादीचे मुलास डोक्याला बुक्यानी मारहाण केल्याने मुक्का मार लागला तसेच फिर्यादीची महिला नातेवाईकाला सुध्दा आरोपीने धकलुन दिले व तिघांना शिवीगाळ केली व फिर्यादीच्या गाडीचा त्याच्या गाडीला धक्का लागला नाही तरि सुध्दा आरोपीने वाद केला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र १११/२०२५ कलम ११८(१), ३५१(२), ३५२ बी एन एस | अमरावती | घ.ता.वेळ दि. ०३-०२-२०२५ चे दुपारी १५.०० वा दाखल ता. वेळ दि. ०३-०२-२०२५ | आरोपी क्र ०१ चा नवरा | १) एक महिला २) सुशील रूपराव जवंजाळ आर्मी जवान रा. रतनपुर सायखेडा ता. चांदुर बाजार अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र.१ हे पती पत्नी असुन यांना दोन मुले असु त्याच्यात आपसात पटत नसल्याने सन२०२३ जुलै महीन्यापासुन आम्ही दोघेही वेगवेगयळे राहतो व दोन्ही मुले सध्या माझी पत्नी कडे राहतात आमचा फरकत करीता कोर्टा केस सुरू आहे दि.१८-०१-२०२५ रोजी मी २५ दिवसाच्या सुट्टीवर पुणेयेथुन अमरावती यथे आलो आहे. माझ्या पत्नीच्या आणि सुशिल रूपराव जवंजाळ आर्मी जवान रा. रतनपुर सायखेडा ता. चांदुर बाजार अमरावती याचा मागील पाच वर्षापासुन अफेयर आहे. म्हणुन माझा आणि माझ्या पत्नीचा फारकतचा कोर्टात सुरू आहे. दि.०३.०२.२०२५ चे दुपारी ०१.०० वा जवळपास मी माझ्या मुलांना भेटायला माझी पत्नी ज्या ठिकाणी भाड्याने राहते त्या ठिकाणी गेलो असता घराच्या बाहेरूनच मोठा मुलगा याला आवाज दिला तर तो बाहेर आला आणि त्याच्या सोबत लहान मुलगा यांना घेवुन मी माझ्या आई वडीलांच्या घरी गेलो व दुपारी ०३.०० वा मी दोन्ही मुलांना सोडण्याकरीता गेलो असता पत्नीचा प्रियकर सुशिल रूपराव जवंजाळ याने किचन मधील चाकु कादुन माझ्या डाव्या हाताच्या मधला बोटावर मारून हात जख्मी केला माझ्या हातातुन रक्त निघाले अशा फिर्दीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे राजापेठ अप.क्र. ५३/२०२५ कलम ४९८,३४ भादवि. | धुळे | दि ०२/०५/२० २३ चे ००.००पुर्वी दाखल दि ०३/०२/२०२५ चे २२.२३ वा | एक महिला | फिर्यादीचे ०६ नातेवाईक | हकीगत अशा प्रकारे आहे की फिर्यादी व आरोपी क्र. १ यांचे रितीरिवाजा प्रमाणे दि. १२/०५/२०१९ मध्ये लग्न झाले असुन एक मुलगा ५ वर्ष मुलगी ४ वर्ष असे असुन आरोपी क्र. १ याने माहेरवरुन पैसे आण व २ ते ६ आरोपीतांनी मानसिक व शाररीक त्रास दिला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपी चे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोस्टे राजापेठ अप.क्र. ५१ /२०२५ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(A) भा.न्या.स. | घर क्र. २४ विदर्भ प्रिमीयम नगरी सामरा नगर अमरावती | दि ०१/०२/२०१५ चे ११.००वा. ते ०३/०२/२०२५ चे १०.३० दाखल दि ०३/०२/२०२५ चे १६.२० वा | रामनारायन तोतोरामसिंग खोजरे वय ७२ वर्ष रा. घर नं. २४ विदर्भ प्रिमियर नगरी सामरा नगर अमरावती | अज्ञात | हकीगत अशा प्रकारे आहे की अशा फी.चे फिर्यादी हे कुटुंबासह नातेवाईकाचे मुलीचे साक्षगंधाकरिता नागपुर येथे असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे दाराचे कुलुप कडीकोंडा तोडुन बेडरुम मधील लोखंडी कपाटातील १) किं.१०,०००रु कि.२२ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र २)किं.६००० रु कि. ६ ग्रॅम कानातले ४ जोड झुमके<br>३) २५००० रु नगदी नोटा ५०- ५००<br>४)किं.४००० रु ४ ग्रॅम च्या दोन अंगठ्या<br>५)किं.१००० रु च्या १ग्रॅम वजनाची नथ एकुण ४६०००/- रु चामाल चोरुन नेला अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपुरी गेटअम. अपक्र. 38/25 कलम 303(२) बि.एन.एस. | ताजनगर न. 2 अमरावती. | दि. 31/01/25 चे 08/00 वा. ते 8/25 वा. दि. 03/02/25 चे 22/42 वा. | गफ्फारखान मस्जिदखान वय 68 रा. ताजनगर न. 2 अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे वेल्डींग कारखाना येथुन काम करुन घरी त्यांची मोटर सायकल क्र. **MH 2 BM 5963** पँशन प्रो. जिसा रंग काळा और उसपर निले रंग के पट्टे हे उसका चेचिच क्र.**MBLHA10A6EHC14322** इंजिनक्र. **HA10ENEHC19573** कि. अं. **30,000/-** घेवुन आले व घरा बाहेर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. आज पावेतो शोध घेतला असता मिळुन आली नाही. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदगाव पेठ अप क्र. ४९/२०२५ कलम २८१, १२५अ भान्यास, १८४ मोवाका | मोर्शी टी पॉईंड जवळ नांदगाव पेठ अमरावती | ०३.०२.२०२५ चे ०९.३० वा दाखल ०३.०२/२०२५ चे १२.२९ वा | नितिन लक्ष्मणराव देशमुख वय ४३ वर्षे रा. पो स्टे मोर्शी अमरावती ग्रामीण | टेम्पो ट्राव्हल वाहन क्र. MH २९ M ८४६९ चा चलक अजय साहेबराव भगत वय २९ रा. तळेगाव श्यामजीपंत वर्धा | हकीकत अशा प्रकारे आहे की, फि हे साप्ताहिक रजेवरुन परत जात असतांना फि. च्या ताब्यातील क्रेटा कारला मोर्शीवरुन अमरावतीकडे विरुध्द दिशेने येणारे वाहन क्र. MH २९ M ८४६९ टेम्पो ट्रॅव्हल ने फि.चे क्रेटा चारचाकी वाहन क्र. MH १९ CZ३००९ ड्राव्हर साईडला धडक मारल्ाने जखमी केले व गाडीचे नुकसान केले टेम्पो ट्राव्हल वाहन क्र. MH २९ M ८४६९ चा चालक अजय साहेबराव भगत वय २९ रा. तळेगाव श्यामजीपंत वर्धा याने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे हयगयीने चालवुन अपघात केला अशा फि. यांच्या जबानी रिपोर्ट वरुन गुन्हा दाकल |
| ०३ | पो.स्टे गाडगेनगर अम शहर अप क्र. १०५/२०२५ कलम २८१, १२५(ब) बी एन एस | जिव्हेश्वर कॉलणी पाण्याच्या टाकीजवळ अर्जुन नगर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.२७/०१/२० २५ चे १८.०० वा. गु.दा.ता.वेळ ०३/०२/२०२५ चे १६.१३ वा. | निखिल भिमराव मिरगे वय ३७ वर्ष रा जिव्हेश्वर कॉलणी पाण्याच्या टाकीजवळ अर्जुन नगर अमरावती | गाडी क्र एम एच १२ डब्लु एस ७६०२ या मो सा चालक. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी ची आई हि जिव्हेश्वर मंदीर मधुन घरी येत असतांना आरोपी याने त्यांची गाडी ने भरधाव वेगाने येवुन धडक मारली त्यामुळे आईला कपाळाला तोंडाला,डाव्या हाताला व उजव्या पायाला मार लागला.अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०४ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र. ३१/२५ कलम २८१,२९६,३ ५१(३)बि एन एस सहकलम १८५ मो वा | ईर्विन चौक अमरावती | घ ता वेळ दि.०३.०२.२० २५ चे २०.०० वा दरम्यान दाखल ता वेळ दि.०३.०२.२० २५ चे २२.१८ वा | डॉ.उल्हास नेमा संघई वय ६८ वर्ष रा प्लॉट नं.५० राजापेठ पोलीस स्टेशन पुढे पो ठाणे राजापेठ अमरावती शहर | विक्रांत उदय ठाकरे वय २९वर्ष रा रुक्मीनी नगर अमरावती हुंडाई कंपनिची पांढ-या रंगाची क्रेटा चारचाकी गाडी क्र.MH २७ DE ४०१९ चा चालक | आज दि.०३.०२.२५ रोजी सायंकाळी २०.०० वा चे दरम्यान मी माझी चेतक कंपनिची इलेक्ट्रिक दुचकी क्र.MH २० GH ७२८३ ने एकटाच डॉ मुधडा रा उस्मानिया मज्जीद जवळुन ईर्विन चौक मार्ग गाडगेनगर कडे जात असतांनी ईर्विन चौक येथे सिग्नल सुटल्यावर गाडगेनगर ला जात असतांनी माझे दुचाकी मागुन हुंडाई कपंनिची पांढ-या रंगाची क्रेटा चारचाकी गाडी क्र. MH २७ DE ४०१९ हि स्पिडने आली व माझ्या दुचाकी गाडीला मागुन धडक दिली त्यामुळे मी माझा गाडीवरुन खाली रोडवर पडलो .मी खाली पडताच त्या चारचाकी गाडीच्या चालकाने त्याची गाडी थांबवुन मला शिवीगाळ करुन माझ्या अंगावर आला व मला ,तुला जे जमते ते करुन घे, मी बघुन घेईल असे म्हणुन तु जर जास्त बोलला तर तुला जीवानीशी ठार करील अशी जीवे मारन्याची धमकी देवुन मला जोरजोरात शिवीगाळ करु लागला त्यामुळे जवळच असलेले ट्राफिक पोलीस आले व त्यांनी त्या चारचाकी चालकाला शांत राहन्यास सांगितले असता तो चारचाकी चालक जोरजोरात शिवीगाळ करतच होता. थोड्या वेळात पोलीस ईर्विन चौक येथे आले व त्यांनी त्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | का | | | | | चारचाकी चालकाला त्याच्या गाडीसह पो स्टे ला आनले .पोलीसांच्या मागेच मी पन चारचाकी गाडी क्र. MH २७ DE ४०१९ चा चालक विरुध्द तक्रार करने करीता पो स्टे ला आलो.पो स्टे ला आल्यानंतर मला चारचाकी गाडी क्र. MH २७ DE ४०१९ चा चालकाचे नाव विक्रांत उदय ठाकरे वय २९वर्ष रा रुक्मीनी नगर अमरावती.असे समजले.तरी मी पो स्टे येवुन चारचाकी क्र. MH २७ DE ४०१९ चालकाने त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन माझे दुचाकीला मागुन धडक देवुन मला अश्लिल शिवीगाळ करुन जिवे ठार मारन्याची धमकी दिल्याने चारचाकी क्र. MH २७ DE ४०१९ चे चालक विक्रांत उदय ठाकरे वय २९ वर्ष रा रुक्मीनी नगर अमरावती .यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करीता तक्रार देत आहोत .मला कोनताही मार न लागल्याने मला वैद्यकीय उपचार करायचा नाही आहे. |

➢ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे गाडगेनगर अम शहर अप क्र. १०६/२०२५ कलम २९६,३५१(२) बी एन एस | अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.३/०२/२०२५ चे १०.०० वा. गु.दा.ता.वेळ३/०२/२०२५ चे १८.१२ वा. | एक महिला | १. एक महिला २.दिपक बोदनकर रा.गोदावरी सोसायटी तपोवन गेट अमरावती. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हि तिचे फ्लॅट समोर पोछा मारत असतांना आ क्र १ ने तिच्या मुलाची चप्पल फेकली तेव्हा फि ने तिला म्हटले तुला दिसत नाही का मी पोछा मारत आहे त्यावर आरोपी क्र १ व २ यांने अश्लिल शिविगाळ केली व मारण्याची धमकी दिली.अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. राजापेठ | अप.क्र. ५२/२०२५ कलम ६५(अ)(ई) मदका | आदर्श नगर अमरावती | ०३.०२.२५ चे १५.१० ते १६.१० वा. | ०३.०२.२५ चे १८.०४ वा. | पोहेकॉ आस्तिक देशमुख ब.नं. २०९ गुन्हे शाखा अमरावती | राहुल सुनिल मेश्राम वय २१ वर्ष रा. आदर्श नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे सदर आरोपी चे ताब्यातुन ९६ नग देशी दारु बॉबी संत्रा १०८ मिली बॉटल कि. अं. प्रत्येकी ७० रु एकुण किं. ६७२० वाहतुक करिता वापरलेली मोपेड विना नंबर जिचा चेचि नं. MB८DP१२PHR८A८९१८६ किं. अं. ६०,०००/- रु असा एकुण ६६७२० रु चा माल मिळुन आल्याने त्याचे विरुध्द गुन्हा दाखल |

- आकस्मीक मृत्यू :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. राजापेठ मर्ग क्र. १४/२०२५ कलम १९४ बीएनएसएस | गोपाल नगर रेल्वे गेट जवळ | -- | अज्ञात | राजु मनोहर डोंगरदिवे वय ४२ वर्ष रेल्वे कर्मचारी | लोको पायलेट यांचे वाकी टाकीवरुन सुचना दिल्यावरुन एकइसम रेल्वेच्या समोर येऊन झोपल्याने तो रण ओवर झाल्याचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |